दिनांक: १९ एप्रिल
२०२१

प्रती,
मा डॉ. नीलम गोऱ्हे,
उपाध्यक्षा
महाराष्ट्रराज्य विधान परिषद

**विषय :- बांधकाम कामगारांच्या प्रश्नाबाबत आपण घेतलेल्या पुढाकारा बाबत मनपूर्वक धन्यवाद**

**मा. महोदया,**

बांधकाम कामगारांच्या सामाजिक सुरक्षा योजनांची पोहोच अधिक सक्षम करण्याकरिता मा. कामगार मंत्री श्री हसन मुश्रीफ आणि प्रधान सचिव श्रीमती विनिता सिंघल, जिल्हा परिषद सी.ई.ओ. श्री आयुष प्रसाद आणि कामगार कल्याण विभागचे विभागीय उपायुक्त श्री. शैलेन्द्र पोळ इत्यादीं सोबत बैठक आयोजित करून बांधकाम कामगारांच्या प्रलंबित प्रश्नावर चर्चा घडवून आणली त्याबद्दल मनपूर्वक धन्यवाद.

सदर बैठकीमध्ये बांधकाम कामगार कल्याण मंडळाचा अधिकारी आणि कर्मचारी यांची नियुक्ती, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यामातून दिल्या जाणारे ९० दिवसांचे प्रमाणपत्र, सामाजिक अकेंषण, घरकाम कामगार कल्याणकारी मंडळ कार्यान्वित करणे आणि निधी आणि योजनांची उपलब्धता करणे, ऑनलाईन पोर्टल आधीक सोपे करणे अशा अनेक धोरणात्मक आणि अंमलबजावणी पातळीवरी बैठकीत प्रशासकीय अधिकारी व मंत्रीमहोदयांनी सकारात्मक भूमिका मांडली. या प्रक्रियेला पुढे नेण्यासाठी खालील मुद्दांचा पाठपुरावा होणे आवश्यक आहे.

१) बांधकाम मजुरांना ३० दिवसात लेबर कार्ड मिळणेबाबत -
मा. प्रधान सचिव विनीता सिंघल यांनी नोंदणीसाठी अर्ज केल्यानंतर ३० दिवसांत त्यावर निर्णय घेतला जाऊन लेबर कार्ड दिले जाईल असा निर्णय झाला असल्याची माहिती

बैठकीत दिली. याबाबतचा आदेश काढला जावा व तो कल्याणकारी मंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध केला जावा ही विनंती.

२) रेशन कार्ड बंद असले तरी रेशन मिळणेबाबत -
सिंघल मॅडमनी रेशन कार्ड बंद असले तरी कडक निर्बंधांच्या कालखंडात रेशन नाकारले जाणार नाही असे मांडले. याबाबतचा प्रशासकीय आदेश निघून तो जिल्हा पातळीवरील पुरवठा अधिकाऱ्यांपर्यंत तातडीने पोहोचवला जावा. स्थानिक पातळीवर या निर्णयाची माहिती नसल्याचे अढळून येते.

३) स्थानिक स्वराज्य संस्थांकडून ९० दिवस प्रमाणपत्र मिळणेबाबत -
महानगरपालिका/नगर परिषद/नगर पंचायत यांनी ९० दिवसांचे प्रमाणपत्र बांधकाम कामगारांना देणेबाबत जी कार्यपद्धती SOP (Standard Operating Procedure) अवलंबावी त्याचा मसुदा आम्ही बनवून दिला आहे. याची अंमलबजावणी करणारा आदेश नगर विकास विभागाने काढून राज्यातील संस्थांना द्यावा.

वरील चर्चा केलेल्या विषयांबाबत लवकरच योग्यती कार्यवाही करण्यास संबंधित विभागांना आदेश द्यावे ही विनंती.

कळावे

श्री आनंद बाखडे(९४२२९६१४२४), श्री बी. युवराज(७७०९०४५०५८) आणि शैलजा आरळकर, (९४२३०१७३१७)

बांधकाम कामगार नोंदणी अभियान कार्यकर्ते